Review Of Research ORIGINAL ARTICLE ISSN:- 2249-894X

# शेतकरी तथा कृषीक्षेत्रा संदर्भात वाङ्मयीन आविष्कार



*बी. टी. अंभोरे*

मराठी विभाग प्रमुख , श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती.



*सारांश :*

*भारत हा कृषीवर आधारित देश असून वर्षानुवर्षे कृषी व्यवस्था ही या देशाच्या आर्थिक गरजांचा मूलाधार राहिली आहे. हजारो वर्षात भौगोलिक बदल घडून आल्यानंतर निसर्गाचा तोल व ताल जसजसा बदलला त्याप्रमाणात कृषीवर त्याचा विपरित परिणाम झाला. भारत हा कृषीप्रधान देश असूनही तो सुफलाम आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळे निसर्गाच्या लहरिपणाचा प्रचंड प्रभाव शेतकऱ्यांच्या शेतीवर व त्यांच्या जगण्यावर निर्माण झाला असून पारंपरिक शेतीचे सर्वच संदर्भ विस्कळीत झाले व शेतकरी आत्महत्या या शेवटच्या टोकाला जाऊन पोहोचला. इतिहासात डोकावतांना मध्ययुगीन काळात शेती हाच इथल्या उत्पन्नाचा महत्वाचा आधार होता. शिवकाळात शेती व शेतकऱ्यांच्या हितासाठी शिवरायांनी कृषीविषयक धोरण व सवलती आखून राज्यात सर्व शेतकऱ्यांना न्याय दिला. रयतेच्या शेतातील एका झाडालाही हात लावू नये असा त्यांनी दंडक काढला होता.*

## प्रस्तावना :

पुढे 19 व्या शतकात महात्मा फुले यांनी भारतीय शेती व त्यावर उपजिविका करणारा शेतकरी यावर मूलगामी चिंतन करुन शेतीसुधारणेच्या संदर्भात 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ व 'तृतीय रत्न' हे नाटक लिहून शेतकऱ्यांचे शोषण व त्यातून होणारा अन्याय यावर उपाय सुचविले. 17 व्या शतकात तुकारामांनी शेतकऱ्यांच्या दैना बोलक्या केल्या. तुकडोजी महाराजांनी ग्रामगितेतून स्वराज्य, ग्रामराज्य, ग्रामसंस्कृती ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत आणून खेड्याला स्वयंपूर्ण व विकासाची गंगा बनविण्याचे कृतीकार्यक्रम आखले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी 19 व्या शतकात शेतकरी पारिषदेचे आयोजन करुन शेतकऱ्यांच्या हितांसाठी शासन दरबारात त्यांचे प्रश्न मांडले व ते सोडविले. 1920 पासून महात्मा गांधींनी खेड्याकडे परत चला हा मंत्र देऊन बहुजन, कुणबी, कष्टकरी यांची खेड्यापासून सुटू पाहणारी नाळ जोडून खेडे संस्कृतीचे जतन व्हावे या हेतूने आपल्या चळवळीत ग्रामस्वराज्याची संकल्पना रुजविण्यासाठी आंदोलन उभी केली. 1915 पासूनच शेती व शेतकरी यांना सतावणाऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी विविध परिषदांचे आयोजन करण्यात आले. 1970 च्या कालखंडात भारती विद्यापीठाच्या सहकार्याने डॉ. आनंद यादव यांनी ग्रामीण मेळाव्याचे आयोजन करून ग्रामीण साहित्य चळवळीच्या विकासाला हातभार लावला. बहिणाबाई चौधरी या मराठवाड्याच्या कुशीतून मातीचे लेणे अंगीखादी मिरवणाऱ्या स्त्रीने मातीचे सर्वच जिवंत संदर्भ घेऊन ते काव्यातून अभिव्यक्त केले.

## ग्रामीण साहित्यः स्वरुप

ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य असे नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात. शेती व शेतकरी यांच्या संदर्भात ग्रामजीवनांचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य अशी ग्रामसाहित्याची व्याख्या करण्यात येत असली तरी ग्रामीण स्त्री, दलित स्त्री, शेतमजूर, अल्पभूधारक, मध्यमवर्गीय शेतकरी यांचे शोषण वर्षानुवर्षे होत आहे. शेतीभोवती बांधल्या गेलेले हे घटक निसर्गाच्या कोपाला बळी पडत आहेत किंवा खेड्यात सावकार, व्यापारी, दलाल यांच्या कचाट्यात सापडून ते या यंत्रणेला बळी पडत आहेत.

आर्थिक विषमता, प्रादेशिक विषमता, सांस्कृतिक उदारीकरण, जातीवर्गीय विषमता, निसर्गाचा असमतोल, सावकारशाहीची लुटमार इ. रोगांनी पछाडलेले खेडे हे साहित्याचा विषय होऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न झाला. शेतीवर पोट जाळणारा कुणबी हा असंख्य प्रश्नात गुंतून उध्वस्त होत आहे.

बदलत्या ऋतुचक्रात अडकून सावकारी पाशात बळी पडून अनेक शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. अवतीभोवतीच्या प्रश्नांच्या गुंत्यात गुंतून आगीत जळण्यापेक्षा त्यावर रामबाण उपाय शोधून कायमची मुक्ती शेतकरी मिळवू लागला. त्यामुळे खेड्यांवर व त्यातील कुटुंबावर मरणाचे हे प्रचंड सावट पसरले. या सर्व व्यथा व वेदनेला 1960 नंतर उदयास आलेल्या समकालीन वाङ्मयीन प्रवाहात मोठ्या प्रमाणात स्थान दिले. कथा, कादंबरी नाटक, कविता या अभिव्यक्तितून शेतकऱ्यांच्या भावविश्वाचे जिवंत दर्शन घडू लागले.

खरेतर कृषी, शेतकरी, शेतीचे व शेतकऱ्यांचे उरीपोटी फुटणारे दुःख, त्यांचे जगण्याचे असंख्य पापुद्रे 1995 पासून मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात उमटू लागले. खेड्यातल्या मातीत जन्म झालेले व त्याच मातीचे संस्कार व बाळकडू प्यालेल्या तरुणांनी निसर्गाचे उरफाटे चक्र, त्यात सापडलेले शेतकरी यांचे दर्शन घराच्या उंबरठ्यावर सहन केले होते या सर्व अनुभवांच्या गाठी सोबतीला घेत त्यावर काव्य रचली. त्याच काळात जागतिकीकरणाचा झंझावात सुरु झाला. खुल्या बाजारपेठेचे धोरण समोर आले व या रेटयात शेतकरी सापडला. गाव पंढरीत त्याची पूर्वी असलेली पत, त्याचा सन्मान या नव्या धोरणात विकल्या गेली. कृषीवलांची एकेकाळी नांदलेली संस्कृती, त्यांचे रीतीरिवाज , आचारपद्धती ही विनाशाकडे झुकली व या प्रचंड महाप्रलयात शेतकऱ्यांची होणारी दैना, त्याचे झालेले बाजारीकरण यावर शेतकऱ्यांची शिकून शहाणी झालेली तरुण पिढी लिहू लागली, बोलू लागली. माणसाचे हरवलेपण, त्यांची उदासीनता त्यांचे शोषण यावर भाष्य करू लागली. दुष्काळ, सावकार, सरकार व चहुबाजुने हवालदील झालेल्या शेतकऱ्यांची वेदना कवितेतून बोलकी होऊ लागली.

"जगाचं जीवन सुफल करणारा सृष्टीचा पालनहार अखेर मृत्युपंथाच्या दिशेने प्रवास करू लागला. कृषिवलांची ही दुरावस्था अनुभवून भूमीपुत्रांनी आपला टाहो कवितेच्या शब्दातून फोडला. शेतात राबणारे मायबाप अंगावर फाटकी लक्तर घालून मुलांना शिकवणारे शेतकरी, शेतीचा निसर्गनिर्भर उजाड कारभार, शेवटी शेतकऱ्यांनी कुटुंबासह लावलेला गळफास हे सर्व भयावह वास्तव नवशिक्षित पिढीच्या चिंतनाचा आणि अभिव्यक्तीचा विषय बनला"1 आपल्या बापाच्या देहाला भडाग्नि देतांना या भूमिपुत्राच्या शब्दातून ज्वालेसारखा उद्रेक बाहेर पडला.

ग्रामीण साहित्यातील दर्शन

मराठीत कृषीविषयक प्रश्नांची मांडणी 1880–85 पासून मोठ्या प्रमाणात झाली. कवी विठ्ठल वाघ, इंद्रजीत भालेराव, भगवान ठग, श्रीकांत देशमुख, सदानंद मोरे, जगदीश कदम, प्रकाश होळकर, भाष्कर बडे, नारायण सुमंत, देविदास सोटे, लक्ष्मण महाडीक, रंगनाथ पठारे, हेमंत दिवटे, प्रमोद शिखरे, प्रकाश किनगावकर, महेंद्र भवरे इ. कवींनी ग्रामीण माणसांना सतावणाऱ्या प्रश्नांची मांडणी केली. शेतकऱ्यांच्या उजाड झालेल्या भावविश्वाला सुखाचे दिवस यावे या भावनेतून कविता अधिक धारदार, कसदार झाली. एकीकडे शहरात भौतिक सुबत्ता व त्यातून आलेला झगझगाट या सर्वांपासून कोसोमैल दूर राहणारा जगाचा पोशींदा असा शेतकरी हे द्वंद्व समाजासमोर उभे केले. समाजातील

वास्तवासोबत विचाराची वीण अधिक घट्ट करत ग्रामीण कविता चळवळीचा केंद्रबिंदू ठरली. खेडे आपली अंगावर पांघरलेली पारंपरिक झुल झुगारून नव्या बदलाच्या संपर्कात येऊ लागली. तेव्हा घडून येणाऱ्या विधायक बदलाचा ग्रामीण कवितेतून उहापोह केल्या गेला.

श्रीकांत देशमुख यांचा 'बळीवंत' व काव्यसंग्रह 1997 साली प्रसिध्द झाला. सतत दुष्काळात पिळल्या गेलेल्या शेतकरी बापाची मातीशी लढा व त्यातही त्याने कुटुंबाचे सुखस्वप्न वास्तवात येण्यासाठी ओझे उचलणाऱ्या बापाला हा संग्रह अर्पण केला. बाप हाच या कवितेचा केंद्रबिंदू आहे. कारण संपूर्ण भूमिपुत्रांना भोगाव्या लागणाऱ्या जखमांचे व्रण वाहणारा बाप या मातीचा पुत्र आहे.

पाहिलं आहे
आभाळ वाकलेलं
भुईसपाट झालेल्या
बापाच्या पाठीवर

प्रचंड आभाळ पाठीवर तोलून धरणारा बाप कंबरेतून वाकला आहे. दुःखाचे पहाड त्याला पेलवत नाहीत. परंतु मातीशी तो संगत सोडत नाही. कारण त्याच्या पोटाची नाळ मातीशी घट्ट विणल्या गेली आहे. कविचा बाप हा माती व आकाशावर जीवापाड प्रेम करतो. मातीच्या जन्मखुणा अंगोपांगी मिरवत तो जेव्हा जगाचा निरोप घेतो तेव्हा मरणानंतरही पाखराच्या रुपाने पूर्नजन्म घेत तो निसर्गाशी आपले नाते हिरवेकंच ठेवतो. मात्र निसर्गाचे लहरीपण त्यालाही जन्मभर नाचवत ठेवते. वादळवाऱ्यांच्या जखमा अंगभर पसरतात. तेव्हा

माझ्या बापाच्या गोठ्यातल्या
गुराढोरांना झालेल्या
पावसाळी जखमा
शेती नापीक करणाऱ्या

बापाचे जीवन निसर्गाच्या कराल दाढीत चक्काचूर होते. अतिवृष्टी व अवर्षण हे दृष्ट चक्र आपल्या खुणा मागे ठेवते. मात्र शेतकरी एकटा कधीच नसतो. त्यांच्या भोवतीचे विश्व हे सुध्दा गोत्यात येते. गुरेढोरे, शेतीवाडी, नाते–गोते यांचा गराडा त्यांच्या भोवती असतो. त्यातील नातेबंध तुटतात. पशुपक्षांवर प्रेम करणारा, पाखरांच्या भूकेने व्याकुळ झालेला शेतकरी सर्वच जीवजंतूंना चारापाणी मिळावा यासाठी धरतीच्या कुशीत बी टाकून भविष्याचे स्वप्न रंगवित असतो. मात्र त्याचे स्वप्न वास्तवात उतरत नाही. दारिद्रयाचे सर्व पाश अंगाभोवती वेटोळे घालतात.

हळु हळु बापुच्या
सदऱ्यावर
तेलाचे डाग जमत गेले
खिशात उंदराच्या लेंड्या
घरातल्या उंदराची संख्या वाढत गेली.

बापाचा लढा हा पोटभर भाकरी मिळावी व सन्मानाने जगता यावे यासाठी असतो. मात्र राबणाऱ्या बापाचे कष्टाचे ओझे दुःखाच्या डोंगराखाली विरुन जातात. जगण्याची उमेद न हरवता मरणाचा ठायी–ठायी अनुभव घेणारा बाप शेवटी निराशेपोटी मरणाचे दार ठोठावतो. घाम गाळणारा, मातीशी नाते जोडणारा शेतकरी पंचत्वात विलीन होतो. श्रीकांत देशमुखांचा बाप मनाला चटका लावून जातो. शेती व शेतकऱ्यांचे परिस्थितीच्या जात्यात पीठ पडते.
सदानंद देशमुख जमीन– जुमला यात शेतकऱ्यांचे उरीपोटी फुटणारे दुःख मांडतात.

वर्षानुवर्ष पंढरपूरची वारी करणारा शेतकरी श्रध्दावान आहे. मात्र त्याची श्रद्धा फळाला येत नाही. त्यामुळे श्रद्धा अंधश्रद्धाचे खत होते. मातीच्या गुंत्यात गुंतलेले भाबडे मन गुंत्यातच कायमचे अडकून पडते.

कारण
सांभाळणेही कठीण झाले
कुणब्याला हा जमीन जुमला
पिकत नाही माती आता
जपत नाही दाणेदुणे
जगणे झाले केविलवाणे

एकेकाळी खंडीनं दाण्याची रास पिकवणाऱ्या शेतकऱ्याला मात्र आता बदलत्या वातावरणात माऊलीची साथ

लाभत नाही. त्याचे ग्रह उलटे फिरले आहेत. शेतकरी हा गावापासूनही तुटत गेला. एकेकाळी गावपांढरीत नांदणारे त्याचे गोकुळ आता उजाड होत आहे.

बापाच्या पावलासोबत आपल्या पाऊलखुणा उमटविणारी माय म्हणजे बापाची प्रतिकृतीच होय.

कवतिकी माझी माय
तिला दांडाचं लुगडं
उन्हा– पावसात न्हाणं
साऱ्या आयुष्याची झड

बापासोबतच दारिद्रयाचे पदर शिवता–शिवता हाडाची काडे झालेली माय जींदगीची लढाई लढता लढता मागे सरत नाही. उलट ती बापाच्या दोन पाऊले पुढे असते. स्त्री कर्तृत्वाचा हा वेगळा नमूना इथे कवी मांडतात. शशिकांत शिंदे शेतकऱ्यांच्या मनाच्या खोलखोल जखमा अभंगाच्या चालीवर प्रभावीपणे मांडतात. माणसाचे लोंढा स्वैरभैर झाल्याची त्यांची जाणिव ही समष्ठीचा विचार मांडते. शेतीची पडझड, आभाळ फाटल्यामुळे न रोखता येणारी प्रलयाची लाट, शासणाचे चुकीचे धोरण सेझच्या माध्यमातून प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावणे यातून शेतकरी पार मोडून पडला आहे.

शहरांकडे जाऊ लागले लोक गाव सोडून
भरमसाठ फुगायला लागल्या झोपडपट्या
बकालं होऊ लागली गावं
ओसाड पडली रानं
गाव म्हणजे अडाणीपणा
गाव म्हणजे दारिद्रय–गाव म्हणजे दुख

या काळात आक्रमणाचा मुकाबला करण्यात गाव हतबल असल्यामुळे मुक्या प्राण्यांसारखी शेतकऱ्यांची दैना होत आहे. नोकरशाही या देशात शेतीविषयक निर्णय घेते व शेतकऱ्यांना आपल्या पोकळ ज्ञानाचे धडे देते. शिक्षित व अशिक्षितांमधील दरी दिवसेंदिवस रुंदावत असल्यामुळे शेतीवर जगणारा शेतकरी वैफल्यातून आत्महत्या करतो.

"ज्याने अन्नधान्य पिकवले त्याला काही विचार आहे तो काही विचार करु शकतो, अन्नधान्यासोबत विचार देऊ शकतो, विचार पिकवू शकतो हेच मुळी विचारवंताच्या पचनी पडले नाही. अन्नधान्य पिकविणाऱ्यांनी विचार पिकवायचा नाही. आणि विचार सांगणाऱ्यांनी अन्नधान्य पिकवायचे नाही, अशी फाळणी झाली आहे. या फाळणीतच आजच्याच नव्हे तर हजारो वर्षापासूनच्या शेतीच्या दुरावस्थेची बीजे पेरली आहेत. "2 असे चंद्रकांत वानखेडे म्हणतात इंद्रजीत भालेराव हे 1990 नंतरचे ग्रामजीवनाला शब्दात तोलणारे महत्त्वाचे नाव. त्याचे पेरा, टाहो या काव्यसंग्रहात शेतकऱ्यांची खुल्या व्यापारी व्यवस्थेच्या धोरणामुळे जी गळचेपी झाली त्याचे हृदय पिळवटून टाकणारे दुःख मांडले आहे.

तू मला वाचवलं नसतसं तर
आतापर्यंत माझ्यावर हराळी
फुटली असती
वडील उपकारकर्त्याविषयी
असं बोलायचे
तेव्हा हराळी म्हणजे काय ते
मला समजत जायचं.

शेतकऱ्याच्या जगण्यातून, शब्दाशब्दातून मरणाचे हुंकार, उपकारकर्त्याविषयी सोशीक भावना आभाळ ओझ्याने दबलेल्या मनाचे हुंकार व त्यातून वाहणारी जखम बोलकी आहे. तर जगदीश कदम नामदेव शेतकऱ्यांची दुःखवेणा शब्दात गुंफतांना नामदेवच्या रुपाने समस्त शेतकऱ्यांचे मातीशी जडलेले ऋणानुबंध अधोरेखीत करतात.

नामदेव शेतकरी
त्याच्या जल्माच्या वेळी
घास कुटका देणारी
नसे बदनाम काळी
ओटीपोटी भरलेली
पावसाळ्यातली नदी

आटलेली दिसली ना
तप्त वैशाखात कधी

श्रमाशी, कर्तृत्वाशी, नाते जपणारा नामदेव शेतकरी काळ्या आईची, जीत्या जनावरांची पूजा बांधतो. मात्र निसर्गाच्या सारिपाटाच्या खेळात तो डाव हारतो व हरल्याची वेदना अंगभर पसरल्यानंतर स्वतःला अग्नी ज्वालेच्या हवाली करून स्वतःचा मृत्यू स्वतः ओढवून घेतो. 'आषाढमाती' या श्रीकांत देशमुख यांच्या कवितेत शेतीवर वर्षानुवर्षे उदरभरण करणारा कुणबी, गावचे अलुतेदार–बलुतेदार हे सर्व पंढरीच्या वारीचे पाईक भक्तीच्या धारेत स्वतः चिंब होतात. त्यांची भक्तीभावना नितळ व पारदर्शक असते. विठोबांना आपले सर्वस्व अर्पण करून विठ्ठलमय झालेले हे सर्व दरबारात कोंडमाऱ्या शिवाय सोबत काहीही घेऊन येत नाहीत.

जागतीकिकरणाच्या झंझावातात समाज पूर्णतः उलटा पालटा झाला. त्यात शेतकरी , त्याचे गाव, शेती, गावगाडा पार बदलून गेले. सोसाटयाच्या वाऱ्यात पूर्ण जमिनदोस्त व्हावे तसे आक्रमण खेडयावर होत असताना

कसायाने कापावा बोकड आणि करावेत तुकडे तुकडे
तशीच माती कापली जातेय
एकदा जमीन आणि झाडे मरू घातल्यावर
खेडयातली माणसं मरायला वेळ लागत नाही.

शेतकऱ्यांच्या भोगवटयाला इथली संपूर्ण व्यवस्था कारणीभूत असून त्या बिकट वास्तवाचे चित्र ग्रामीण कवितेतून समोर येते. "एक संपूर्ण संस्कृतीच व्यापारी लोभाच्या अवाढव्य लाटेत मरू घातलीय. गावात उकिरडा ही दौलत असते. कारण उकिरडाच मातीला, पिकाला चैतन्य देतो; पण आता महासंगणकाच्या काळात या अशा गोष्टी किंवा खेडुताचं व्यवस्थेचं केंद्र असणंच मुळी हास्यास्पद झालंय. सगळं रंजक माहितीच्या पातळीवर आलंय. उपभोग, बेबंद उपयोग हा परवलीचा शब्द झालाय, संगणक सारी प्रगती करील अशा बेताल बडबडीत जिथं मूळ निर्मिती होतेय, त्या ठिकाणची खेडयाची प्रतिष्ठा धुळीला मिळालीय" ३ जगाच्या या कराल उलथा पालथीत सृजनांचा, त्यांच्या स्वप्नांचा पार चुराडा होत आहे. शेतकऱ्याने भूमित खपून हरित क्रांतीचे जे नवे हिरवे जग उभे केले त्याचा डोळ्या देखत होत असलेला चोळामोळा हे नित्याचेच मरण आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा समाजाला सतावणारा ज्वलंत प्रश्न. या देशात कोटयावधीचे कर्ज बुडवून राजरोसपणे, उजळमाथ्याने वावरणारी माणसे निर्ढावलेपणाने जगतात. परंतु शेतकरी मात्र या प्रवृत्तीचा नसतो त्याच्या शोषणाला कोण जबाबदार हेच त्याला कळत नाही. इतरांसारखा तो आवाज उठवू शकत नाही हेच त्याचे दुर्दैव होय

अशा प्रकारे ग्रामीण कवितेने जसे जागतिकीकरणाने उदध्वस्त झालेल्या शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले त्या सोबतच खेडे, निसर्ग, पारंपरिक मूल्ये यांची भरभरून मांडणी केली. उदयोन्मुख ग्रामीण कविच्या विश्वाचे अनेक शिलेदार आहेत. दा.र.दळवी, वाहरू सोनवणे, प्रतिभा इंगोले, इंद्रजित भालेराव, महेश केळूसकर, प्रकाश विठ्ठल किनगावकर, वसंत केशव पाटील, सदानंद देशमुख, महेंद्र भाष्कर पाटील यांची कविता ग्रामीण विश्वाचे असंख्य पदर उलगडून दाखवित आहे.

## संशोधन समस्या –

भारतातील व प्रामुख्याने महाराष्ट्रातील शेती व शेतकरी हा साहित्याचा चिंतेचा व तेवढाच चिंतनाचा विषय राहिला असून या विषयावर भरभरून लिहिल्या गेले. ग्रामीण, प्रादेशिक जीवनातील समस्या व शेतकऱ्याचे उरीपोटी फुटणारे दुःख, समोर ठेवून त्यांच्या समस्या मांडण्याचे काम या शोधनिबंधात करण्यात आले.

## संशोधन पद्धती –

शेतकरी शेतमजूर, गरीब जाती वर्गातील असंख्य जातीतील खालचा स्तर हा नेहमी स्फोटक विषय राहिला आहे. शेतकरी हा समाजाचा आर्थिक कणा आहे. त्यांच्याच भरोशावर जग चालते. मात्र हाच जगाचा पोशिंदा आज लिलावात निघाला आहे . या समाजाला ग्रासणाऱ्या विषयाचा अभ्यास समाजशास्त्रीय पद्धतीने करण्यात आला आहे.

## निष्कर्ष –

१.भारत हा कृषीवर आधारित देश असून कृषीची मूळं ही समाजात खोलवर रूजली आहेत.
२.शेतीसंदर्भात मध्ययुगीन काळात व आधुनिक काळात अनेक संशोधकांनी संखोल चिंतन केले.
३. भारतीय शेती निसर्गावलंबित असल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणाचा प्रचंड दबाव या क्षेत्रावर पडत आहे.
४.मराठी साहित्यात शेतीसंदर्भात प्रश्न माडणारे अनेक लेखक, कवी, सुधारक यांनी साहित्य निर्माण केले.

*५.मराठीतील ग्रामीण, प्रादेशिक साहित्यात शेतीचे अनेक संदर्भ बोलके झाले.*
*६.1990 नंतरच्या जागतिकीरणाच्या झंझावातात व शासणाच्या विकासात्मक धोरणाच्या प्रभावात ग्रामीण शेतकरी पार मोडून गेला. पारंपरिक शेतीचे सर्व जुने संदर्भ मोडीत निघालेय. नवीन तंत्रज्ञानाचा अभाव यात सापडलेल्या शेतकऱ्यांचे दुःख नवोदित कविंनी मांडले.*
*७.मराठीतील ग्रामीण साहित्याचा, शेतीविषयक साहित्याचा प्रांत समृद्ध असून हे वाड्मयीन दालन दिवसेंदिवस वेगवेगळया अनुभवविश्वांनी सपंन्न होत आहे.*

### *संदर्भग्रंथ –*


*1 डॉ. किशोर सानप, सर्वधारा, ऑ. नो. डिसें 2001, पृष्ट 21*
*2 चंद्रकांत वानखडे, शेतिनिरक्षर अंगठेबहाद्दर विव्दान, आकांक्षा, सप्टे 2008*
*3 रंगनाथ पठारे, प्रस्तावना, आषाढ माती – श्रीकांत देशमुख पृ.108*
*4 नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन औरंगाबादे*